# अलिबाबा आणि चाळीस चोर

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय बा. वा.
दा. क्र. ६२५९



म. ग्रं. सं. ठाणे
IRBK-0106259
IRBK-0106259

अनुक्रम 3
विभाग
क्रमांक
नौ. दि.
...नालय

# अलिबाबा आणि चाळीस चोर

अनुक्रम 27433
विभाग
क्रमांक
नों. दि.

चंद्रकांत काकोडकर

IRBK-0106259
IRBK-0106259

सद्‌भिरुचि प्रकाशन, पुणे २.

प्रकाशिका

**सौ. उषा कुलकर्णी**

सदभिरुचि प्रकाशन

७७३ सदाशिव पेठ, पुणें २.

✦ ✦ ✦

प्रथमावृत्ती स. १९५७

✦ ✦ ✦

मुद्रक

**वि. ग. माटे**

'विश्वकर्मा' मुद्रणालय,

१५/१ सदाशिव पेठ, पुणें २.

अनुक्रम २१.४८३
विभाग
क्रमांक

## १४. अलिबाबा आणि चाळीस चोर

फार प्राचीन काळीं इराणमधील एका शहरांत दोन भाऊ रहात होते. एकाचं नांव होतं कासिम आणि दुसऱ्याचं नांव होतं अलिबाबा. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांनीं संपत्तीची सारखी वांटणी केली आणि कांहीं दिवसांतच सारी संपत्ती उधळून लावली. वडिलभावानं एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या मुलीशीं लग्न केल्यामुळं अन् लवकरच तो व्यापारी—त्याचा सासरा वारल्यामुळं तो दुर्मिळ व मौल्यवान सामानाच्या दुकानाचा मालक बनला. तसंच त्या व्यापाऱ्यानं जमिनींत पुरून ठेवलेलं धनही त्याला मिळालं. त्यामुळं लौकरच त्याची एक श्रीमंत इसम अशी ख्याती सर्वत्र पसरली.

परंतु अलिबाबानं जिच्याशीं लग्न केलं ती गरीब होती. तीं दोघं झोपडींत रहात होतीं. अलिबाबा रोज जंगलांत जात असे आणि लाकडं तोडून ती आपल्या तीन गाढवांवर लादून शहरांत नेऊन विकीत असे. आणि जे कांहीं पैसे मिळत त्यावर आपला अन् आपल्या पत्नीचा चरितार्थ चालवीत असे.

एके दिवशीं नहमींप्रमाणं जंगलांत जाऊन त्यानं झाडाच्या सुक्या फांद्या वगैरे तोडून पुरेसं सरपण गोळा केलं अन् तें आपल्या गाढवावर लादलं. इतक्यांत त्याच्या उजव्या बाजूकडून हवेंत धुळीचे लोट उडत असलेले व ते त्याच्याकडे येत असलेले त्याला दिसले. त्यानं जेव्हां बारकाईनं न्याहाळून पाहिलं तेव्हां त्याला घोडेस्वारांची एक टोळी येतांना दिसली. त्या टोळीला पाहून त्याला भीति वाटली. त्याला वाटलं कीं, ते दरोडेखोर असावेत आणि ते आपणाला ठार करून आपलीं गाढवं घेऊन जातील. या भीतीमुळं तो धावूं लागला. परंतु ते फारच नजीक आल्यामुळं त्यांच्या हातांतून निसटून जंगलाबाहेर पडणं त्याला शक्यच नव्हतं. त्यामुळं त्यानं आपल्या गाढवांना एका आडवाटेनं दाट झाडींत नेलं आणि तो स्वत: एका झाडावर चढून बसला. तिथून त्याला खालचं सारं कांहीं दिसत होतं. परंतु तो मात्र कुणालाही दिसणं शक्य नव्हतं.

त्याबरोबर गुहेचा दरवाजा आपोआपच बंद झाला. कारण ती जादूच अशी होती कीं कुणीही आंत गेला कीं दरवाजा आपोआप बंद होत असे. आणि कुणी आंतून बाहेर आल्यावर "तिळा तिळा दार बंद कर" असं म्हटल्याशिवाय दरवाजा बंद होत नसे.

दरवाजा बंद झाल्यावर आपल्या गाढवांना हांकलत तो गांवांत आपल्या घरीं आला. पहिल्या प्रथम त्यानं फाटकाचं दार बंद करून गाढवांवरील सरपण उतरून ठेवलं. नंतर त्यांवरील सोन्या चांदीच्या नाण्यांच्या पिशव्या घेऊन तो आपल्या बायकोकडे गेला. तिनं त्या पिशव्या चांचपून पहिल्या. त्या पिशव्या नाण्यांनीं भरलेल्या आहेत हें पाहून तिला वाटलं कीं अलिबाबानं कुठं तरी दरोडा घातला असला पाहिजे. म्हणून ती त्याला दोष देत मारूं लागली. तेव्हां अलिबाबा तिला म्हणाला, "मी दरोडा घातलेला नाहीं. आपलं दैव उदयाला आलं आहे ह्याबद्दल आनंद मान!"

असं म्हणून त्यानं घडलेली सर्व हकिगत तिला सांगितली आणि मग त्यानं पिशव्यांतलीं आणि पोत्यांतलीं नाणीं तिच्या समोर ओतलीं. नाण्यांची ती रास पाहून तिचे डोळे दिपून गेले. अलिबाबानं सांगितलेली हकीगत ऐकून तिला आनंद झाला आणि ती नाणीं मोजूं लागली. तेव्हां अलिबाबा तिला म्हणाला, "मूर्ख आहेस तूं! तूं एक एक करीत किती वेळ हीं नाणीं मोजीत बसणार? मला अगोदर एक खड्डा खणून हीं सारीं नाणीं पुरून ठेऊं दे म्हणजे ही गुप्त गोष्ट कुणाला समजणार नाहीं!"

"तुझं म्हणणं बरोबर आहे. परंतु त्या आधीं त्यांचं वजन तरी करूं या म्हणजे त्याचं वजन किती आहे ह्याचा अंदाज तरी येईल आपणाला!" त्याची पत्नी म्हणाली.

"जशी तुझी मर्जी." तो म्हणाला. "परंतु ही गोष्ट कुणाला समजणार नाहीं ह्याची खबरदारी घे!"

त्या नाण्यांचं वजन करून त्यांच्या किमतीचा अंदाज करण्यासाठीं म्हणून कांटा व वजनं आणण्यासाठीं ती धांवतच कासीमच्या घरीं गेली. तिला कासीम घरीं भेटला नाहीं म्हणून ती त्याच्या बायकोला म्हणाली, "तुमचा तराजू थोडा वेळ मला द्या!"

" तुला मोठा तराजू पाहिजे कीं लहान पाहिजे ? " तिच्या जावेनं तिला विचारलं.

" मोठा नको. लहानच तराजू द्या ! " आलिबाबाची बायको म्हणाली.

" जरा थांब. तुला हवा असलेला तराजू शोधून देते ! " तिची जाऊ म्हणाली आणि ती तराजू शोधण्याचं निमित्त करून आंत गेली. आंत गेल्यावर तिनं तराजूच्या पारड्याला खालच्या बाजूनं मेण आणि लाख लावली आणि मग तराजू आणून तिला दिला. ती कशाचं वजन करते हें जाणण्यासाठीं तिनं ी युक्ति योजली होती. तिची खात्री होती कीं ती ज्याचं वजन करील ती वस्तु तराजूच्या पारड्याला चिकटून येईल आणि अशा तऱ्हेनं आपणाला आपली जिज्ञासा पूर्ण करतां येईल.

अलिबाबाच्या बायकोला याची कांहींच शंका अगर संशय आला नाहीं. त्यामुळं सरळ घरीं येऊन ती नाण्यांचं वजन करूं लागली आणि ती पुरून ठेवण्यासाठीं अलिबाबा,खड्डा खणूं लागला.

सर्व नाण्यांचं वजन करून झाल्यावर त्या दोघांनीं मिळून तीं नाणीं त्या खड्ड्यांत ठेवून वर माती घालून खड्डा बुजविला. नंतर अलिबाबाच्या बायकोनं तो तराजू परत आपल्या जावेला नेऊन दिला. तराजूच्या पारड्याला एक सोन्याचं नाणं चिकटून गेलं आहे हें तिला कळलं सुद्धां नाहीं.

परंतु तें नाणं कासीमच्या बायकोच्या दृष्टीला पडतांच मत्सरानं आणि रागानं तिच्या अंगाचा दाह झाला. ती स्वत:शींच म्हणाली, ' माझा तराज त्यांनीं सोन्याच्या नाण्यांचं वजन करण्यासाठीं नेला होता तर ! '

अलिबाबासारख्या गरीब मनुष्याला तराजूनं वजन करण्याइतकीं नाणीं कुठून मिळालीं याचं तिला मोठं आश्चर्य वाटलं. तिनं या गोष्टीवर बराच विचार केला. संध्याकाळीं कासिम घरीं आल्यावर ती त्याला म्हणाली, " तूं स्वत:ला मोठा श्रीमंत समजतोस. परंतु तुझ्या शेजारीं तुझा भाऊ अलिबाबा तुझ्यापेक्षां कितीतरी पटीनं श्रीमंत आहे ह्याची तुला कल्पना आहे काय ? त्याच्याजवळ सोन्याच्या नाण्यांच्या राशीच्या राशी आहेत आणि त्याला ती नाणीं तराजूनं वजन करावीं लागतात आणि तूं आपली नाणीं फक्त मोजण्यांतच सुख मानतोस ! "

" तुला हें कसं कळलं ? " कासिमनं विचारलं.

तेव्हां तिनं तराजूविषयीं आणि त्याला चिकटून आलेल्या सोन्याच्या नाण्याबद्दल त्याला सारं सांगून तें नाणं त्याला दाखविलं. त्या नाण्यावर प्राचीन राजाचे शिक्के होते. तें नाणं पाहून द्वेश, मत्सर आणि लोभ यामुळं कासिमला सबंध रात्र झोप आली नाहीं. त्यामुळं तो अगदीं सकाळींच उठून अलिबाबाकडे गेला आणि म्हणाला, "दिसण्यांत तूं अत्यंत गरीब आणि गरजूं दिसतोस. परंतु तुझ्याजवळ भरपूर संपत्ती मात्र आहे! जवळच्या नाण्यांचं तराजूनं वजन करावं लागतं इतका तूं श्रीमंत आहेस!"

"तूं काय बोलतोस हें मला समजत नाहीं." आलिबाबा म्हणाला. "काय तें स्पष्ट बोल ना!"

"मी काय बोलतों तें समजत नसल्याचं उगाच ढोंग करून मला फसवूं नकोस!" आणि आपल्या हातांतलं नाणं त्याला दाखवीत त्यानं म्हटलं, "अशा तऱ्हेचीं हजारो नाणीं तुझ्या जवळ आहेत. त्यांतलं हें एक माझ्या बायकोला तराजूच्या पारड्याला चिकटलेलं सांपडलं!"

आतां अलिबाबाला समजून चुकलं कीं कासिमला आणि त्याच्या बायकोला आपल्याकडे सोन्याच्या मोहरांचा सांठा आहे हें समजलं आहे. आतां ती गोष्ट लपवून ठेवली तर त्यामुळं वैरभाव मात्र वाढेल असं त्याला वाटलं. म्हणून त्यानं तें दरोडेखोर आणि त्यांनीं लपवून ठेवलेली संपत्ती याबद्दलची सारी हकिकत त्याला सांगितली.

ही हकिकत ऐकतांच कासिम म्हणाला, "तर मग ती गुहा उघडण्याचे आणि बंद होण्याचे ते जादूचे शब्द मला समजले पाहिजेत. मी तुला ताकीद देतो कीं जर तूं सारं खरं सांगितलं नाहींस तर तुझ्या त्या मोहरांची हकीगत मी सुभेदाराला सांगेन आणि मग तो तुझं सारं द्रव्य हरण करील आणि तुला तुरुंगांत घालील!"

तेव्हां अलिबाबानं त्याला सारी माहिती सांगून जादूचे ते शब्दही सांगितले.

ही सर्व हकिगत काळजीपूर्वक लक्षांत ठेऊन दुसरे दिवशीं कासिम भाड्यानं खेचरं घेऊन ती जागा शोधण्यास निघाला आणि त्यानं शेवटीं ती जागा शोधून काढली. त्या खडकाजवळ आल्यावर अलिबाबानं सांगितलेल्या

वर्णनाप्रमाणं सारं कांहीं जमलं आहे हें पाहून त्याला आनंद झाला आणि तो ओरडला. "तिळा तिळा, दार उघड !"

त्याबरोबर दरवाजा उघडला आणि कासिम गुहेंत गेला. आंत गेल्यावर त्याला जिथं तिथं रत्नं आणि अलोट संपत्ती पसरलेली दिसली. तो आंत येतांच गुहेचा दरवाजा नेहमींप्रमाणं आपोआपच बंद झाला.

कासिम आश्चर्यानं आनंदित होऊन गुहेंत सर्वत्र हिंडला. त्याच्या आश्चर्याचा भर ओसरल्यावर आणि हिंडून हिंडून कंटाळा आल्यावर त्यानं मोहरांच्या पिशव्या एकत्र जमविल्या. आपल्या गाढवावर लादून नेतां येतील तेवढ्याच पिशव्या त्यानं घेतल्या आणि त्या घेऊन तो दरवाजाजवळ गेला. परंतु सर्वशक्तिमान अल्लाच्या इच्छेभुळं तो जादूचे ते शब्द पार विसरून गेला. दरवाजापाशीं येऊन तो ओरडला, " बाजरी बाजरी दार उघड !"

परंतु दरवाजा उघडला नाहीं. तेव्हां तो आश्चर्यचकित होऊन गेला आणि त्यानं प्रत्येक धान्याचं नांव घेऊन दार उघड म्हटलं. परंतु त्याच्या स्मरणांतून गेलेलं तिळा हें नांव कांहीं त्याच्या तोंडांतून बाहेर पडलं नाहीं. जणू तो शब्द त्यानं पूर्वी कधीं ऐकलाच नव्हता. त्यामुळं अत्यंत गोंधळलेल्या मनःस्थितींत मोहरांच्या पिशव्यांकडे लक्षही न देतां गुहेंत इकडे तिकडे फिरूं लागला. ज्या द्रव्याचं दर्शन कांहीं क्षणापूर्वीं त्याच्या आनंदाला कारणीभूत झालं होतं तेंच द्रव्य आतां त्याच्या दुःखाला कारण झालं होतं—

दुपारच्या सुमारास ते दरोडेखोर त्या जंगलांत आले तेव्हां त्यांना कासिमनं आणलेली खेचरं त्यांना दिसली. तीं खेचरं कुणी आणलीं असावीं याचं त्यांना आश्चर्य वाटलं. कासिमनं खेचरांना एके ठिकाणीं बांधून ठेवलं नव्हतं त्यामुळं तीं इकडे तिकडे भटकत होती. त्या चोरांना तीं शहरापासून तकीं दूर कशीं आलीं याचंच आश्चर्य वाटत होतं. लवकरच ते व त्यांचा म्होरक्या त्या गुहेजवळ आले आणि त्यानं ते ठराविक शब्द उच्चारले. त्याबरोबर दरवाजा उघडला—

कासिमला गुहेंत घोड्यांच्या टापांचा आवाज एकूं येत होता. तो आवाज जसा जसा जवळ जवळ येऊं लागला तसतशी त्याची खात्री पटूं लागली कीं तो आवाज दरोडेखोरांच्या घोड्यांच्या टापांचाच आहे. त्याला भीति वाटूं लागली कीं ते गुहेंत येतांच आपणाला ठार करतील. त्यामुळं तो भीतीनं

जमिनीवर पडून राहिला. परंतु दरवाजा उघडतांच धीर करून निसटण्याच्या आशेनं तो बाहेर पळाला. पण तो त्या दरोडेखोरांच्या त्या म्होरक्याच्या पायाशीं येऊन पडला. त्याबरोबर म्होरक्याच्या शेजारीं असलेल्या एका दरोडेखोरानं आपली तलवार उपसली आणि कासिमचे दोन तुकडे केले.

त्यानंतर ते दरोडेखोर गुहेंत शिरले. तेव्हां कासिमनं जमविलेल्या मोहरांच्या पिशव्या त्यांना दिसल्या. त्यांनीं त्या पूर्ववत ठेऊन दिल्या. अलिबाबानं त्यांतल्या किती नेल्या हे त्यांच्या ध्यानींही आलं नाहीं. त्या नवल्या गृहस्थानं– कासिमनं गुहेंत कसा प्रवेश केला याबद्दल आश्चर्यानं ते दृङमूढ झाले होते. उजेड येणाऱ्या वरील झारोक्यांतून तो आंत येणं शक्य नाहीं हें सर्वांना माहीत होतं. कारण तो खडक उंच आणि चढण्यास कठिण होता. वर चढण्याचा मार्गही अत्यंत उभा होता त्यामुळं कुणाला वर चढणं शक्य नव्हतं आणि दरवाजा उघडून आंत येणं हें ते जादूचे शब्द माहीत असल्याशिवाय शक्य नव्हतं. विचार करूनही त्यांना तो आंत कसा आला हें ठरवितां येईना. शेवटी त्यांनीं कासिमच्या देहाचे चार तुकडे केले आणि त्यांतील दोन गुहेच्या उजव्या बाजूला व दोन डाव्या बाजूला टांगून ठेवले. जो कोणी गुहेंत प्रवेश करण्याचा प्रयत्न करील त्याला ती जणू धोक्याची सूचनाच होती. नंतर गुहेच्या बाहेर पडून त्यांनीं गुहेचा दरवाजा बंद केला व ते आपल्या नेहमींच्या उद्योगाला निघून गेले.

रात्र झाली तरी कासिम घरीं आला नाहीं हें पाहून कासिमची पत्नी अलिबाबाच्या घरीं जाऊन त्याला म्हणाली, "तुझा भाऊ कासिम अजून आला नाहीं. तो कुठं गेलाय हें तुला माहीत आहे. मला भीति वाटतें कीं त्याच्यावर कसल तरी संकट कोसळलं असलं पाहिजे !"

तो परत आला नाहीं त्याला कांहीं तरी दुर्दैवी घटनाच घडली असली पाहिजे असं अलिबाबाला वाटलं तरी तो आपल्या भावजयीचं समाधान करण्यासाठीं म्हणाला, "वहिनी, तो कुणाच्या नजरेला पडूं नये म्हणून मुख्य रस्ता सोडून आडवाटेनं येत असेल. म्हणून त्याला उशीर झाला असावा असं मला वाटतं !"

हें ऐकून तिचं समाधान झालं आणि ती आपल्या घरीं गेली व नवऱ्याची वाट पहात बसली. परंतु मध्यरात्र उलटून गेली तरी तो येईना तेव्हां

विभाग
क्रमांक ११
नं. दि. 2213



मात्र ती काळजीनं अन् भीतीनं गांगरून गली. दुःखामुळं तिला रडू कोसळलं. परंतु तिला मोठ्यानं रडताही येईना. कारण रडणं ऐकून शेजारी येतील आणि मग त्यांना गुपित समजेल अशी तिला भीति वाटत होती. म्हणून ती हळू हळू रडूं लागली. तिच्या मनांत यऊं लागलं, ' अलिबाबाचा मत्सर आणि हेवा वाटणारी ती गोष्ट मला कशाला कळली ? त्या मत्सराचं अन् द्वेषाचं फळ म्हणून हा दुर्दैवी प्रसंग माझ्यावर आला. '

उरलेली रात्र तिनं दुःखानं अश्रू गाळीत घालविली अन् सकाळ होतांच ती घाई घाईनं अलिबाबाच्या घरीं गेली आणि आपल्या नवऱ्याच्या शोधाला जाण्याची तिनं त्याला विनंती केली.

अलिबाबानं तिचं सांत्वन केलं आणि तो आपली गाढवं घेऊन तत्काळ भावाच्या शोधार्थ रानांत जावयास निघाला. लवकरच तो त्या खडकाजवळ आला. तिथं त्याला रक्ताचे डाग दिसले. ते पाहून त्याला आश्चर्य वाटलं. त्याला तिथं आपला भाऊ दिसला नाहीं कीं त्याचीं दहा खेचरंही दिसली नाहींत. तेव्हां त्यानं ओळखलं कीं त्याच्यावर कसलं तरी संकट ओढवलं आहे.

नंतर तो गुहेच्या दाराजवळ गेला आणि म्हणाला, " तिळा तिळा, दार उघड ! "

दार उघडल्याबरोबर तो आंत गेला. त्याबरोबर त्याला कासिमचा मृत देह टांगत असलेला दिसला. तें दृश्य पाहून तो घाबरून गेला. तरी त्यानं कासिमच्या देहाचे ते चार तुकडे दोन कपड्यांत बांधले व आपल्या गाढवांवर ठेवले. नंतर त्यानं काटक्यानीं अन् सरपणानं तें कोणालाही दिसणार नाहींत अशा तऱ्हेनं झांकले. एवढं झाल्यावर त्यानं सोन्याच्या मोहरांच्या पिशव्या आणून त्या दुसऱ्या दोन गाढवांवर लादून त्याही कुणाला दिसणार नाहींत अशा तऱ्हेनं झांकून टाकल्या. सर्व व्यवस्थित झाल्यावर त्यानं जादूच्या शब्दांनीं गुहेचा दरवाजा बंद केला व तो घरीं जाण्यास निघाला—

घरी जातांना तो सर्व बाजूला बारकाईनं लक्ष देत जात होता. स्वतःच्या घराजवळ आल्यावर त्यानं सोन्याच्या मोहरा असलेलीं गाढवं आपल्या पत्नीच्या ताब्यांत दिलीं व त्या मोहरा तिला पुरून ठेवण्यास सांगितलं.

परंतु आपण कोणत्या परिस्थितींत भावाच्या घरीं जात आहोंत हें मात्र त्यानं तिला सांगितलं नाहीं.

ज्या गाढवावर भावाचं प्रेत होतं तें गाढव घेऊन तो भावाच्या घरीं आला आणि त्यानं हळूच दार ठोठावलं, कासिमची मार्गियाना नांवाची एक हुशार अन् चतूर दासी होती. तिनं हळूच दार उघडलं व अलिबाबाला त्या गाढवासकट आंत अंगणांत घेतलं. अलिबाबानं तें प्रेत गाढवावरून खालीं उतरवलं व तो हळूच म्हणाला, " मार्गियाना, आपल्या मालकाला पुरण्याचे धार्मिक विधि करण्याच्या तयारीला लाग. मी आंत जाऊन तुझ्या मालकिणीला ही बातमी सांगतों. आणि लगेच तुला मदत करायला परत येतों ! "

ह्याचवेळीं कासिमच्या बायकोनं आपल्या दिराला पाहिलं आणि तिनं त्याला विचारलं, " माझ्या नवऱ्यासंबंधीं तूं काय बातमी आणली आहेस ? तुझ्या चेहऱ्यावर दुःखाची चिन्हं दिसत आहेत. काय घडलं तें लवकर सांग बघूं ! "

अलिबाबानं तिच्या नवऱ्याची काय अवस्था झाली आणि कशा तऱ्हेनं आपण त्याचं प्रेत घरीं आणलं आहे हें सारं तिला सांगितलं आणि तो शवटीं म्हणाला, " वहिनी, जें व्हायचं तें झालं. परंतु आतां ती गोष्ट गुप्त ठेवणंच आमच्या हिताच्या दृष्टीनं योग्य आहे. त्याच्या गुप्तपणावरच आतां आपलं आयुष्य अवलंबून आहे ! "

हें ऐकून ती रडूं लागली आणि म्हणाली, " माझ्या नवऱ्याचं दैवगतीनं जें व्हायचं तें झालं. परंतु तुझ्या सुरक्षिततेसाठीं ती गोष्ट गुप्त ठेवण्याचं मी वचन देतें ! "

" अल्लाची मर्जी असेल त्या प्रमाणंच होणार ! " अलिबाबा म्हणाला. त्याच्या विरुद्ध कुणी कांहीं करूं शकत नाहीं. विधवापणाचे तुझें दिवस संपेपर्यंत थांब. नंतर मी तुझ्याशीं लग्न करीन म्हणजे तुला आरामांत सुखानं रहातां येईल ! माझी पहिली बायको तुला त्रास देईल किंवा तुझा द्वेप करील याची तूं भीति बाळगूं नकोस. कारण ती कोमल अंतःकरणाची व दयाळ आहे ! "

कासिमची बायको आपल्या एकंदर दुःखानं रडत म्हणाली, " तुझ्या म्हणण्याप्रमाणं होऊं दे ! "

अलिबावानं आपल्या भावाबद्दल शोक करीत तिचा निरोप घेतला व मार्गियानाजवळ जाऊन आपल्या भावासंबंधीं सल्लामसलत करूं लागला. बराच वेळ विचार विनिमय केल्यावर त्यानं तिला योग्य सूचना व ताकीद दिली व तो आपल्या गाढवाला हांकलीत आपल्या घरीं गेला–

आलिबाबा निघून गेल्यावर मार्गियाना एका औषधाच्या दुकानांत गेली व दुकानदाराला खरी गोष्ट न सांगतां त्याला फसविण्यासठीं म्हणून तिनं वेडाचा झटका येणाऱ्या माणसाला देण्याचं औषध मागितलं. त्यानं तें औषध तिला दिलं व विचारलं, " ह्या औषधाची जरूरी असलेला कोण आजारी मनुष्य तुझ्या घरीं आहे. ? "

" माझा धनी कासिम आजारी आहे व तो मरणाच्या पंथाला लागला आहे. बरेच दिवस झाले तो कांहीं बोलत नाहीं कीं कांहीं खातपीतही नाहीं. त्यामुळं आम्हीं त्याच्या जगण्याची आशा जवळ जवळ सोडलीच आहे ! " मार्गियाना म्हणाली.

दुसरे दिवशीं ती पुन्हां त्या दुकानांत गेली आणि दुकानदाराकडे तिनं मृत्यूपंथाला लागलेल्या रोग्याला लावावयाचे औषध व अर्क मागितले. दुकानदारानं तिनं मागितलेलीं औषधं दिलीं. तीं औषधं हातांत घेऊन ती दुकानदाराकडे पहात रडं लागली व म्हणाली, " मला वाटतं हीं औषधं घेण्याइतकी सुद्धां त्याच्या अंगीं आतां शक्ती नाहीं. मी घरीं पोंचण्यापूर्वीच त्याचा कारभार आटोपलेला असेल ! "

अलिबाबा कासिमच्या घरांतून रडण्याचे सूर यण्याचीच वाट पहात होता. ते ऐकूं येतांच तिथं जाऊन अंत्यविधीचा भार स्वतःवर घ्यायचा त्यानं बेत केला होता.

दुसरे दिवशीं सकाळीं मार्गियाना बाबा मुस्ताफा नांवाच्या एका वृद्ध शिंप्याकडे गेली. त्याचा धंदा प्रेतांसाठीं कपडे शिवणं हा होता. त्यानं दुकान उघडतांच तिनं त्याच्या हातावर एक सोन्याचं नाणं ठेवलं व ती त्याला म्हणाली, " तुझ्या डोळ्यांवर पडदा बांधून तूं माझ्याबरोबर ये ! "

मुस्ताफानं तिच्या बरोबर जाण्यास उत्सुकता दाखविली नाहीं. तेव्हां

मार्गियानं त्याला आणखी एक सोन्याचं नाणं दिलं व आपल्याबरोबर येण्याची विनंती केली. त्या शिंप्यानं द्रव्याच्या लोभानं तें कबूल केलं. तेव्हां तिनं त्याच्या डोळ्यांवर रुमाल बांधला आणि त्याचा हात धरून ती जाऊं लागली. तिनं त्याला ज्या घरांत आपल्या धन्याचं प्रेत होतं त्या घराजवळ त्याला आणलं अन् एका अंधाऱ्या खोलींत त्याला नेऊन त्याच्या डोळ्यांवरील रुमाल सोडला. नंतर तिनं त्याला प्रेताचे चार तुकडे शिवण्यास सांगितलं व एक कपडा त्याच्या अंगावर फेंकून त्या प्रेतासाठीं कपडा शिवण्यास सांगितलं. ती म्हणाली, " ह्या प्रेताच्या अंगाला योग्य असा कपडा लवकर शीव म्हणजे तुला मी आणखी एक नाणं देईन ! "

बाबा मुस्तफानं थोड्या मापाचा कपडा शिवला. त्याबरोबर तिनं त्याला कबूल केल्याप्रमाणं एक सोन्याचं नाणं दिलं. नंतर तिनं पुन्हां त्याचे डोळे बांधले आणि त्याला त्याच्या दुकानावर नेऊन सोडलं. त्यानंतर ती घरीं परत आली आणि आलिबाबाच्या मदतीनं कासिमच्या शरिराला आंघोळ घालून तो शिवलेला कपडा त्या प्रेताला घातला व तें पुरण्याच्या तयारीनं एका स्वच्छ जागीं ठेवलं.

एवढं झाल्यावर मार्गियाना मशिदींत गेली आणि तिनं एका इसमाला एक दफन एका घरांत थांबलं आहे अशी वर्दी दिली व तेथें येऊन मृताबद्दल प्रार्थना म्हणण्याची त्याला विनंती केली. तो इसम तिच्याबरोबर घरीं आला. नंतर शेजाऱ्यांनीं ती शवपेटी खांद्यावर घेतली. तो इसम आणि अशा प्रसंगीं सहाय्य करणारे इतर लोक त्यांच्या बरोबर निघाले. दफन विधीच्या प्रार्थना संपल्यावर प्रेतयात्रा निघाली. मार्गियाना उघड्या डोक्यानं सर्वां- पुढं होती. ती आपली छाती सारखी बडवून घेत आक्रोश करीत होती. त्यांच्या मागोमाग अलिबाबाही होता.

अशा तऱ्हेनं स्मशानांत जाऊन त्यांनीं तें प्रेत पुरलं आणि सर्व विधी आटोपून सर्व मंडळी आपल्या मार्गानं निघून गेली.

त्यानंतर रिवाजाप्रमाणं शहरांतील स्त्रिया कासिमच्या विधवेकडे आल्या. त्यांनीं तिचं सांत्वन करून तिला समाधानाच्या चार गोष्टी सांगितल्या व त्या निघून गेल्या. अलिबाबानं चाळीस दिवस आपल्या भावाच्या मृत्यूबद्दल

औपचारिकरित्या सुतक पाळलं. त्यामुळं तो स्वतः कासिमची वायको अन् मार्गियाना याशिवाय कोणालाही ती गुप्त गोष्ट कळली नाहीं !

सुतकाचे चाळीस दिवस संपल्यावर अलिबाबानं मृताच्या मालकीची सर्व इस्टेट आपल्या घरीं नेली व उघडपणं आपल्या विधवा भावजयीशीं लग्न केलं. नंतर त्यानं आपल्या सर्वांत वडील पुतण्याला दुकानाची व्यवस्था पहाण्यास ठेवलं. त्याला धंद्याची व खरेदि विक्रीची चांगली माहिती होती–

एके दिवशीं नेहमींप्रमाणं ते दरोडेखोर त्या गुहेंत आले असतां कासिमचं प्रत तिथून कुणी तरी नेल्याचं त्यांना दिसून आलं. त्यांना त्याचं मोठं आश्चर्य वाटलं. त्यांचा म्होरक्या त्यांना म्हणाला, "आतां आम्हांला या बाबतींत सारी चौकशी केलीच पाहिजे. नाहींतर आम्हांला बरंच नुकसान सोसावं लागणार आणि पूर्वजांपासून इथं जमविलेला हा खजिना लवकरच खलास होणार !"

त्याच्या ह्या म्हणण्याला सर्वांनीं संमत्ती दिली. त्यांनीं ज्याला ठार मारलं होतं त्याला, ज्या जादूच्या शब्दांनीं दरवाजा उघडत असे त्याची माहिती असली पाहिजे. तसंच त्याच्याशिवाय दुसऱ्या कुणाला तरी ती माहिती असली पाहिजे व त्यानंच तें प्रेत तिथून नेलं असलं पाहिजे याबद्दल सर्वांचं एकमत झालं. तसंच त्यानं सोन्या चांदीचीं बरींच नाणीं नेलीं आहेत हेंही त्यांच्या लक्षांत आलं. त्यामुळं जोरदार खटपट करून त्या माणसाचा शोध करण्याचं त्यांनीं ठरविलं. त्यानंतर बराच विचार विनिमय करून त्यांनीं ठरविलं कीं त्यांच्यापैकीं जो हुशार अन् हजारजबाबी होता त्यानं गांवांत जाऊन रस्तोरस्तीं फिरून नुकताच कुणी मयत झाला आहे कीं काय याची माहिती मिळवावी अन् तो कुठं रहात होता हें शोधून काढावं म्हणजे मग हवा असलेला मनुष्य शोधून काढतां येईल.

यावर तो हुशार दरोडेखोर म्हणाला, "मला गावांत जाऊन त्यासंबंधीं माहिती मिळवून आणण्यास परवानगी द्या. त्यांत अपयश आल्यास मी प्राण देण्यासही तयार आहें !"

त्याप्रमाणं त्या रात्रीं वेष बदलून तो त्या गावांत गेला व सकाळीं बाजाराच्या चौकांत आला. सकाळच्या त्या प्रहरीं बाबा मुस्ताफाखेरीज कुणाचंही दुकान उघडलं नव्हतं. बाबा मुस्ताफा सुई दोरा घेऊन आपल्या

दुकानांत बसून काम करीत बसला होता. त्या चोरानं बाबा मुस्ताफाजवळ येऊन त्याला सलाम करून म्हटलं, "अद्याप बाहेर अंधार असतांना तुला शिवायला कसं दिसतं ?"

"तूं इथं नवखा आहेस असं दिसतं !" बाबा मुस्ताफा म्हणाला. "माझं वय बरंच झालं असलं तरी माझी दृष्टी अद्याप तीक्ष्ण आहे. थोड्याच दिवसांपूर्वी एका अंधाऱ्या खोलींत मी एक प्रेत शिवलं आहे. आहेस कुठं तूं !"

हें एकतांच तो दरोडेखोर स्वत:शींच म्हणाला, 'या माणसाकडून मला पाहिजे असलेलीं माहिती मिळणार असं दिसतं !' आणि आणखी माहिती मिळविण्याच्या हेतूनं तो त्याला म्हणाला, "मला वाटतं तूं माझी थट्टा करीत आहेस. तूं प्रेतावर घालायचा कपडा शिवलास. तोच तुझा धंदा आहे !"

त्यावर बाबा मुस्ताफा चटकन् म्हणाला, "त्याच्याशीं तुझा कांहींच संबंध नाहीं. तूं मला आणखी प्रश्न विचारूं नकोस !"

तेव्हां त्या दरोडेखोरानं एक सोन्याचं नाणं त्याच्या हातावर ठेवलं. आणि तो म्हणाला, "तूं जें गुप्त ठेवीत आहेस तें मला कळून घेण्याची इच्छा नाहीं. तुला एवढंच सांगतों कीं मी प्रामाणिक आहें आणि माझ्या-कडून गुप्त गोष्ट बाहेर कधीं फुटणार नाहीं. तूं मला एवढेंच सांग कीं तें काम तूं कोणत्या घरांत केलंस !"

त्या शिप्यानं तें सोन्याचं नाणं लोभीपणानं घेतलं आणि तो म्हणाला, "त्या घरीं जाण्याचा रस्ता कांहीं मी माझ्या डोळ्यांनीं पाहिला नाहीं. एक गुलाम दासी माझ्याकडे आली आणि तिनं माझे डोळे बांधून माझ्या हाताला धरून मला त्या घरापर्यंत नेलं. तिथं गेल्यावर एका अंधाऱ्या खोलींत तिनं मला नेलं आणि प्रेताचे तुकडे माझ्या पुढ्यांत ठेवले. नंतर तिनं माझ्या डोळ्यांवरचा रुमाल सोडला व ते तुकडे मला शिवण्यास सांगितलं. त्याच-प्रमाणं त्या प्रेतासाठीं कपडाही शिवण्यास सांगितलं. तें सर्व झाल्यावर तिनं पुन्हां माझे डोळे बांधले व मला परत इथं आणून सोडलं. त्यामुळं तें घर तुला कुठं सापडेल हें मला सांगतां येणार नाहीं !"

"तुला जरी तें घर माहीत नसलं तरी जिथं तुझे डोळे बांधले तिथपर्यंत

तूं मला घेऊन जा. तिथं मी तुझे डोळे बांधीन आणि तिनं तुला जसं हात धरून नेलं तसं मी तुला घेऊन जाईन. अशा तऱ्हेनं कदाचित् तें घर आपणाला सांपडेल. ही मेहरबानी तूं माझ्यावर केलीस तर हें आणखी एक नाणं मी तुला देईन !" असं म्हणून त्या दरोडेखोरानं एक नाणं त्याच्या हातावर ठवलं.

बाबा मुस्ताफानं तें नाणं आपल्या खिशांत ठेवलं आणि दुकान तसंच उघडं ठेवून मार्गियानानं जिथं त्याचे डोळे बांधले होते तिथं तो त्या दरोडे-खोराला घेऊन गेला. तिथं त्या दरोडेखोरानं त्याच्या डोळ्यांवर एक रुमाल बांधला व त्याचा हात धरून तो चालूं लागला. बाबा मुस्ताफा हुशार अन चतुर होता. मार्गियानानं त्याला ज्या रस्त्यानं नेलं होतं त्या रस्त्यानं तो पावलं मोजीत चालूं लागला. कांहीं अंतर चालून गेल्यावर तो एकाएकीं थांबून म्हणाला, " इतकंच अंतर मी तिच्याबरोबर चालून आलों ! "

आणि ते दोघे थांबले. ते दोघे कासिमच्या घरासमोर उभे होते सध्यां अलिबाबा त्या घरांत रहात होता—

त्या दरोडेखोरानं त्या घराच्या दारावर पांढऱ्या खडूनं खूण केली. त्याला वाटलं अशी खूण केली तर तें घर पुन्हां केव्हांही आपणाला शोधून काढतां येईल. नंतर त्यानं बाबा मुस्ताफाच्या डोळ्यांवरील रुमाल सोडला व त्याला म्हणाला, " बाबा मुस्ताफा, तुझ्या मेहेरबानीबद्दल मी तुझा अत्यंत आभारी आहें. अल्ला तुझ्या ह्या चांगुलपणाबद्दल तुला योग्य बक्षीस देवो ! " असं म्हणून त्यानं त्याला विचारलं, " ह्या पलिकडच्या घरांत कोण रहातो हें तुला माहीत आहे काय ? "

" शहराच्या ह्या भागाची खरोखरच मला कांहीं माहिती नाहीं ! " बाबा मुस्ताफा म्हणाला.

शिप्याकडून आणखी कांहीं माहिती मिळणं शक्य नाहीं हें ओळखून त्या दरोडेखोरानं त्याचे खूप आभार मानले आणि त्याला त्याच्या दुकानावर पोचवून तो इतर दरोडेखोर जिथं त्याची वाट पहात होते तिथं गेला—

इकडे तो दरोडेखोर आणि बाबा मुस्ताफा घराजवळून गेल्यावर जेव्हां मार्गियाना कांहीं कामासाठीं म्हणून घराबाहेर पडली तेव्हां दारावर खडूच्या पांढऱ्या खुणा पाहून तिला मोठं आश्चर्य वाटलं. क्षणभर ती तशीच उभी

राहून विचार करूं लागली. तिच्या मनांत आलं कीं कुणी तरी शत्रू येऊन ह्या खुणा करून गेला असला पाहिजे आणि त्या खुणांवरून तें घर ओळखून आपल्या धन्याचा घात करण्याचा त्याचा विचार असला पाहिजे. म्हणून तिनं एक पांढरा खडू घेतला आणि शेजारच्या सर्व घरांच्या दारांवर हुबेहूब तशाच खुणा केल्या. परंतु तिनं ती गोष्ट गुप्तच ठेवली— आपल्या धन्याला अगर मालकिणीलाही सांगितली नाहीं—

त्या दरोडेखोरानं आपल्या सहकाऱ्यांना आपल्या साहसाची सर्व माहिती सांगितली. नंतर त्यांचा म्होरक्या आणि इतर दरोडेखोर निरनिराळ्या मार्गांनीं शहरांत गेले. ज्यानं अलिबाबाच्या घरावर खूण केली होती तो त्यांच्या म्होरक्याबरोबर होता. त्यानं सरळ त्याला त्या घराकडे नेलं व ती खूण दाखवून तो म्हणाला, "आपण ज्याचा शोध करीत आहोंत तो इथं रहातो!"

परंतु म्होरक्यानं आजूबाजूला पाहिल्यावर सर्वच दारावर एकाच तऱ्हेच्या खुणा असलेल्या पाहून त्याला आश्चर्य वाटलं. त्यानं विचारलं, "ह्या सर्व घरांवर एक सारख्याच खुणा आहेत. ह्या पैकीं तूं म्हणतोस तें घर कुठचं?"

हें ऐकून दरोडेखोर अत्यंत आश्चर्यचकित झाला. तो गोंधळून गेला. त्याला कांहींच उत्तर देतां येईना. नंतर तो शपथ घेऊन म्हणाला, "मी खरोखरच एका दारावर खूण केली होती. परंतु त्या इतर दारांवर खुणा कोणी केल्या आणि मी खूण केलेला दरवाजा नक्की कोणता हें मला सांगतां येणार नाहीं!"

तेव्हां तो म्होरक्या आणि तो दरोडेखोर बाजारांत आले व आपल्या इतर सहकाऱ्यांना भेटले. त्यांचा म्होरक्या म्हणाला, "आपण फुकटच सर्व धडपड केली. जें घर शोधण्यासाठीं आपण निघालों होतों ते कांहीं सांपडलं नाहीं. आतां आपल्या ठरलेल्या जागीं रानांत परत चला. मीही तिथंच जातों!"

त्याबरोबर ते निरनिराळ्या वाटेनं परत गेले आणि त्या गुहेंत जमले. सर्व दरोडेखोर जमल्यावर, ज्या दरोडेखोरानं आपणांला खोटं सांगून फसविलं व निष्कारण शहरांत भटकविलं त्याला शिक्षा दिलीच पाहिजे असा

म्होरक्यानं निर्णय घेतला आणि त्याप्रमाणं त्यानं त्याला सर्वांसमक्ष कोंडून ठेवलं. नंतर तो बाकीच्यांना म्हणाला, "आपलं द्रव्य हिरावून नेणाऱ्या इसमाचा जो कुणी शोध लावील त्याला मी खास बक्षीस देईन !"

तें ऐकून त्यांच्यापैकीं एक इसम पुढं होऊन म्हणाला, "मी तें काम अंगावर घेण्यास तयार आहे. खात्रीनं मी त्याचा शोध करून तुझी इच्छा पूर्ण करीन !"

तेव्हां म्होरक्यानं त्याला मोठ्या बक्षीसाचं आश्वासन देऊन कामावर पाठविलं—

दैवयोगानं हा दुसरा दरोडेखोरही प्रथम बाबा मुस्ताफाच्या दुकानावरच आला आणि पूर्वीच्या दरोडेखोरानं जसं केलं तसंच त्यानंही केलं. पहिल्या दरोडेखोराप्रमाणं त्यानंही त्याला सोन्याच्या नाण्याचं आमिष दाखवून व त्याचे डोळे बांधून त्याला अलिबाबाच्या घराकडे नेलं. तिथं गेल्यावर त्यानं आपल्या पूर्वीच्या सहकाऱ्यानं केलेली पांढरी खूण पाहिली म्हणून त्यानं दारावर लाल खडूनं खूण केली. पांढऱ्या असलेल्या सर्व घरांतून नेमकं तें घर शोधून काढतां यावं म्हणून त्यानं लाल खडूनं खूण केली होती. खूण केल्यावर लगेंच तो आपल्या सहकाऱ्यांना भेटण्यासाठीं म्हणून गुप्त ठिकाणीं गेला—

मार्गियाना बाहेर आल्यावर तिला ती लाल खूण दिसली. त्याबरोबर तिनं धूर्तपणानं इतर दारांवरही तशाच खुणा केल्या. परंतु आपण काय केलं ह्याबद्दल तिनं कुणालाही कांहीं सांगितलं नाहीं—

इकडे तो दरोडेखोर आपल्या सहकाऱ्यांकडे जाऊन मोठ्या घमेंडीनं म्हणाला, "मी तें घर शोधून काढलं आहे आणि त्यावर लाल खडूनं खूण केली आहे. त्यामुळं शेजारच्या आजुबाजूच्या घरांतून तें सहज ओळखतां येईल !"

परंतु पूर्वीप्रमाणं जेव्हां ती टोळी तिथं गेली तेव्हां सर्वच घरांवर त्यांना लाल खडूची खूण आढळून आली. त्यामुळं निराश होऊन ते परत गेले. ह्यानुळं दरोडेखोरांचा तो म्होरक्या नाखूष अन् दुःखी बनला. त्यानं त्या दुसऱ्या दरोडेखोराला बंदींत टाकलं. तो स्वतःशींच म्हणाला, 'दोन माणसांना ह्या प्रयत्नांत अपयश आलं आणि त्यांना योग्य तीं शिक्षाही

मिळाली. आतां तिसरा कुणी त्या घराचा शोध करण्याचा प्रयत्न करणार नाहीं. तेव्हां आतां स्वतः मीच जाऊन त्याचं घर शोधून काढतों ! ''

त्याप्रमाणं त्यानं बाबा मुस्ताफाच्या मदतीनं अलिबाबाचं घर शोधून काढलं. त्यान त्या घरावर बाहेरून कसलीही खूण केली नाहीं. त्यानं त्या घराचं नीट निरीक्षण करून तें आपल्या स्मृतिपटावर कायमचं कोरून ठेवलं. नंतर रानांत आपल्या सहकाऱ्यांकडे जाऊन तो म्हणाला, '' तें घर मी आतां चांगलं स्मरणांत ठेवलं आहे त्यामुळं तें सांपडण्यांत कांहीं अडथळा येणार नाहीं. आतां बाजारांत जाऊन एकोणीस खेचरं विकत आणा. तसंच मोहरीच्या तेलानं भरलेलं एक मोठं पिंप आणा आणि त्या पिंपासारखींच परंतु रिकामीं अशीं आणखी सदतीस पिंपं आणा. प्रत्येक पिंपांत एक याप्रमाणं तुम्हांला हत्यारबंद असं त्या पिंपांत मी ठेवीन. नंतर प्रत्येक खेचरावर दोन पिंपं याप्रमाणं अठरा खेचरांवर छत्तीस इसम राहतील. राहिलेल्या एका खेचरावर एक तेलाचं पिंप आणि तुम्हांपैकीं एक जण असलेलं पिंप ठेवून मी तेलाच्या व्यापाऱ्याचा वेष घेऊन खेचरांना हांकलीत शहरांत जाईन अन् रात्रीच्या वेळीं त्या घरीं जाऊन रात्रभर मुक्काम करण्याची परवानगी घेईन. मग रात्र झाल्यावर संधी साधून त्याला ठार मारण्याचा प्रयत्न करूं ! '' आणि जरा थांबून तो पुन्हां म्हणाला, '' त्याला ठार मारल्यावर मग त्यानं नेलेली आपली सर्व संपत्ती त्या पिंपांत भरून खेचरांवर लादून परत आणू ! ''

ही युक्ति सर्वांना पसंत पडली. ताबडतोब त्यांनीं बाजारांत जाऊन एकोणीस खेचरं, एक तेलाचं पिंप आणि सदतीस रिकामीं पिंपं आणली--

तीन दिवसांनंतर संध्याकाळ होण्याच्या सुमारास त्यांनीं सर्व पिंपांना बाहेरून तेल लावलं. नंतर प्रत्येक भांड्यांत एक एक ह्या प्रमाणं हत्यारांनीं सुसज्ज अशा स्थितींत ते लपून बसले. त्यांच्या म्होरक्यानं व्यापाऱ्याचा वेष घेतला आणि तीं पिंपं एकोणीस खेचरांवर लादलीं. सदतीस पिंपांत हत्यारबंद दरोडेखोर होते अन् अडतिसाव्या पिंपांत तेल होतं. एवढं सर्व झाल्यावर तो खेचरांना हांकलीत शहरांत जाण्यास निघाला--

आणि रात्र होण्याच्या सुमारास तो अलिबाबाच्या घरापाशीं आला. तो तिथं आला तेव्हां अलिबाबा आपलं जेवण उरकून घरासमोर शतपावली

करीत होता. त्यानं अलिबाबाला सलाम केला व तो त्याला म्हणाला, “ मी एका खेड्यांतून तेल घेऊन आलों आहें. मी बऱ्याच वेळां या शहरांत तेल विकण्यास येतों. परंतु यावेळीं दु:खाची गोष्ट म्हणजे मला इथं शहरांत यायला रात्र झाली आहे आणि रात्र कुठं काढावी याची मला मोठी विवंचना पडली आहे. मजवर कृपा करून आपण मला रात्रभर इथं राहूं द्याल काय ? तसच ह्या खेचरांवरचं हें ओझं ठेवायला एकादी जागा अन् खेचरांच्या चाऱ्यापाण्याचीही व्यवस्था आपण केली तर मोठी मेहरबानी होईल माझ्यावर ! ”

अलिबाबानं झाडावर बसला असतांना त्या म्होरक्याचा आवाज ऐकला होता अन् त्याला गुहेंत शिरतांना त्याला पाहिलंही होतं. परंतु आतां त्यानं इतकं बेमालूम वेषांतर केलं होतं कीं त्यामुळं अलिबाबा त्याला ओळखूं शकला नाही. त्यानं त्याची विनंती मान्य केलीं अन् रात्रभर आपल्या घरांत रहाण्याची त्याला मुभा दिली. नंतर त्यानं घराशेजारची एक रिकामी झोपडी त्याला दिली व त्यांत त्याचा माल आणि खेचरांना ठेवण्यास सांगून खेचरासाठीं धान्य आणि पाणी आणण्यास एका नोकराला हुकूम दिला. नंतर तो मार्गियानाला म्हणाला, “ एक पाहुणा इथं आला आहे अन् रात्रभर तो इथं रहाणार आहे तेव्हां त्याच्या जेवणाची आणि झोपण्याची सोय कर ! ”

त्या म्होरक्यानं खेचरांवरील पिंपं खालीं उतरविलीं आणि त्यांना खाणं घालून पाणी दिलं. आणि तो अलिबाबाच्या घरांत आला. अलिबाबानं त्याचं अत्यंत आदरानं स्वागत केलं आणि त्याच्यासमोर मार्गियानाला म्हणाला, “ या पाहुण्याच्या आदरातिथ्यांत कांहीं कमतरतां करूं नकोस कीं त्याला कशाचीही उणीव भासूं देऊं नकोस. आतां असं कर, उद्यां सकाळीं मी स्नान करण्यासाठीं हमाममध्यें जाणार आहें. तेव्हां स्नानानंतर घालण्याचें माझे सफेद कपडे तयार ठेवण्यास अबदुल्लाला सांग. तसंच रात्रीं माझ्यासाठीं थोडी कांजी करून ठेव म्हणजे सकाळीं स्नान करून परत आल्यावर मला ती खातां येईल ! ”

“ तुम्ही सांगितल्याप्रमाण मी सारी तयारी करतें ” असं म्हणून ती निघन गेली.

पाहुण्याची सारी व्यवस्था झाल्यावर अलिबाबा झोपण्यास निघून गेला.

जेवण आटोपल्यावर दरोडेखोरांचा तो म्होरक्या झोपडींत गेला अन् सर्व खेचरांना पोटभर खाणं पिणं मिळालं आहे ह्याची त्यानं खात्री करून घेतली. नंतर एका पिपाजवळ जाऊन तो हळूच म्हणाला, “ मध्यरात्रीं जेव्हां मी आवाज करीन तेव्हां तुम्ही आपल्या जवळच्या चाकूनं पिपाचीं चामड्याचीं झांकणं कापून बाहेर पडा ! ”

ही सूचना सर्वांना देऊन त्याला झोपण्यासाठीं म्हणून जी खोली दिली होती तिथं जाण्यास तो निघाला. स्वयंपाक घरासमोरूनच त्या खोलींत जावं लागत असे. तो स्वयंपाक घराजवळ आला तशी मार्गियाना दिवा घेऊन वाट दाखविण्यासाठीं आली. खोलींत आल्यावर मार्गियाना त्याला म्हणाली, “ तुम्हांला आणखी कांहीं हवं असलं तर या दासीला सांगा. मी आपल्या सेवेला तत्पर आहें ! ”

“ मला आतां कांहीं नको आहे ! ” तो म्हणाला.

मार्गियाना बाहेर गेल्यावर त्यानं दिवा मालवला आणि आपल्या सहाकाऱ्यांना उठवून आपलं काम फत्ते करण्याच्या वेळेची वाट पहात तो बिछान्यावर झोपला.

मार्गियाना अलिबाबानं सांगितलेलं काम करूं लागली. प्रथम तिनं पांढरे कपडे काढले व ते अब्दुल्लाच्या स्वाधीन केले. हा वेळपर्यंत तो जागाच होता. नंतर तिनं कांजी करण्यासाठीं म्हणून चुलीवर एक भांडं ठेवलं आणि ती कांजी करूं लागली. कांजीला लवकर उकळी यावी म्हणून विस्तव चांगला पेटविला. कांजीला उकळी आली कीं नाहीं हें पहाण्यासाठीं तिला दिवा हवा होता. परंतु घरांतले सारे दिवे गेले होते आणि सर्व तेलही संपलं होतं. त्यामुळं तिला तेल असलेला दिवा कुठं मिळेना. त्यामुळं ती गोंधळून अन् त्रासून गेली. अबदुल्लाच्या लक्षांत हें येतांच तो तिला म्हणाला, “ इतका जळफळाट कशाला करतेस ? त्या पलिकडच्या झोपडींत तेलाचीं पिपं आहेत तिथं जाऊन तुला पाहिजे तितकं तेल घेऊन ये ! ”

मार्गियानानं ह्या सूचनेबद्दल त्याचे आभार मानले. अबदुल्ला सकाळीं लवकर उठून धन्याबरोबर हमाममध्यें जायला पाहिजे म्हणून झोपायला गेला. तो गेल्यावर मार्गियाना तेलाचं एक भांडं घेऊन त्या झोपडींत गेली.

तिथं रांगेनं तेलाचीं पिपं तिला दिसलीं. ती एका पिपाजवळ आल्यावर तिच्या पावलांचा आवाज एका चोराला ऐकू आला. तो आवाज आपल्या म्होरक्याचाच असावा असं वाटून त्यानं विचारलं, "आम्ही बाहेर येण्याची वेळ आली काय ?"

तो मानवी आवाज ऐकून मार्गियाना एकदम दचकली. परंतु ती धीर आणि हजरजबाबी असल्यामुळं तिनं चटकन् उत्तर दिलं, "अजून वेळ आली नाहीं !" आणि ती स्वतःशींच म्हणाली, 'हीं पिपं तेलानं भरलेलीं नाहींत. यांत कांहींतरी गुढ आहे खास ! त्या तेलाच्या व्यापाऱ्याच्या मनांत माझ्या धन्याला दगा फटका करण्याचा तर विचार नाहीं ना ? अल्ला, तूं दयाळू आहेस. आम्हांला ह्या संकटांतून वांचव !"

म्हणून तिनं त्या म्होरक्याच्या आवाजासारखा आवाज काढून म्हटलं होतं कीं, "नाहीं अजून ती वेळ आली नाहीं !"

नंतर ती दुसऱ्या पिपाकडे गेली. त्या पिपांतल्या माणसालाहि तिनं पहिल्याप्रमाणंच उत्तर दिलं. असं एका मागून एक अशा सर्व पिपांजवळ जाऊन तिनं केलं. नंतर ती स्वतःशींच म्हणाली, 'परमेश्वराची धन्य असो ! माझ्या धन्यानं ह्या व्यापाऱ्याला तेलाचा व्यापारी समजून आसरा दिला. परंतु ती एक दरोडेखोरांची टोळी दिसते आणि इशारा मिळतांच त्याला ठार करून लूट करण्याचा त्यांचा बेत दिसतो !'

ती शेवटच्या पिपाजवळ आली तेव्हां तें पिप तिला तेलानं कांठोकाठ भरलेलं असल्याचं आढळून आलं. तिनं आपलं तेलाचं भांडं भरून घेतलं आणि स्वयंपाक घरांत जाऊन दिव्याची वात सारखी करून दिवा लावला. नंतर तिनं एक मोठी कढई आणून ती चुलीवर ठेवली व ती त्या पिपांतल्या तेलानं भरली. नंतर तिनं चांगलीं लाकडं लावून जाळ केला. त्यामुळं लवकरच कढईतलं तेल उकळू लागलं. तेल उकळल्यावर तिनं एका भांड्यांत त्यातलं थोडं थोडं घेऊन तें चोर असलेल्या प्रत्येक पिपांत ओतलं. त्यांना बाहेर पडणं अशक्य झाल्यामुळं उकळत्या तेलानं ते भाजून मेले. आणि त्या प्रत्येक पिपांत एक एक प्रेत राहिलं. अशा रीतीनं आपल्या अक्कलहुशारीनं त्या दासीनं कोणत्याही प्रकारची गडबडघाई न करतां व घरांतल्या कुणालाही न कळवतां त्या सर्वांचा शेवट केला. पिपांतले सर्व दरोडेखोर

गेल्याची खात्री पटल्यावर ती पुन्हां स्वयंपाक घरांत गेली व आपल्या धन्यासाठीं कांजी करूं लागली.

सुमारे एका तासानंतर तो म्होरक्या झोंपेतून उठला आणि त्यानं आपल्या खोलीची खिडकी उघडली. सर्वत्र अंधार होता. त्यानं आपल्या लोकांना पुढं येण्याची खूण म्हणून टाळी वाजविली. परंतु त्याला कांहींच हालचाल ऐकूं आली नाहीं. जरा वेळानं त्यानं पुन्हां टाळी वाजविली. परंतु त्याला कांहीं जबाब मिळाला नाहीं. तिसऱ्यांदा टाळी वाजवून अन् हांका मारूनही जेव्हां त्याला कांहींच उत्तर मिळालं नाहीं तेव्हां तो गोंधळून गेला. त्याच्या मनांत आलं कीं कदाचित् त्यांना गाढ झोप लागली असली पाहिजे. म्हणून त्यांना उठवून आपला कार्यभाग साधण्यासाठीं तो पिंप असलेल्या त्या झोपडींत गेला. परंतु पिंपाजवळ जातों तों त्याला तेलाचा व मांसाचा वास आला. त्याबरोबर तो एकदम दचकला. त्यानं पिंपाला बाहेरून हात लावून पाहिलं तों तें गरम असल्याचं त्याला आढळून आलं. त्यावरून आपल्या टोळींवर कोणतं आरिष्ट कोसळलं आहे हें त्यानं ओळखलं त्याबरोबर त्याला स्वतःच्या जिवाचीही भीति वाटूं लागली आणि स्वतःचा जीव वांचविण्यासाठीं तो तटावर चढला आणि तिथून बाहेर उडी मारून पळून गेला.

मार्गियानानं त्याच्या परत येण्याची थोडा वेळ वाट पाहिली. परंतु तो झोपडींतून परत आला नाहीं हें पाहून तिनं ओळखलं कीं तो भिंतीवरून उडी मारून पळून गेला आहे. अशा तऱ्हेनं सर्व चोरांना वाटेला लावल्यावर मार्गियाना निश्चित मनानं झोपीं गेली.

पहाटेच्या सुमारास अलिबाबा उठला. रात्रीच्या एकंदर प्रकाराची त्याला कांहीं माहिती नसल्यामुळं तो हमाममध्यें स्नानासाठीं निघून गेला. मार्गियानानं त्याला रात्रीं झोपेंतून तें सारं सांगण्यासाठीं उठवलं नव्हतं. तिला त्याची गरजही वाटली नाहीं. कारण त्याला आपला बेत सांगितला तर त्यांत कांहीं गडबड होऊन अपयश येईल अशी तिला धास्ती वाटत होती. म्हणून तिनं त्याला कांहींच सांगितलं नव्हतं.

स्नानगृहांतून अलिबाबा परत घरीं आला तेव्हां सूर्य उगवून बराच वेळ झाला होता. जेव्हां तेलाची ती पिंपं अजूनही तशींच झोपडींत पडून आहेत

असं त्यानं पाहिलं तेव्हां त्याला मोठं आश्चर्य वाटलं. त्यानं मार्गियानाला विचारलं, "पाहुण्यानं अद्याप आपलीं तेलाचीं पिंपं बाजारांत कशी नेलीं नाहींत ?"

"सारी अल्लाची कृपा आहे !" मार्गियाना म्हणाली. "आतां तुम्ही गप्प रहा. आंत गेल्यावर तुम्हांला सारी हकिगत सांगतें. तुम्ही मोठ्यानं बोलूं लागलांत तर सर्व शेजाऱ्यांना सारं ऐकूं जाईल आणि मग सारा घोटाळा होईल. तुम्ही त्या सर्व पिंपांत पहा म्हणजे आंत काय आहे तें तुम्हांला दिसेल !"

अलिबाबानं सर्व पिंपांत पाहिलं तेव्हां प्रत्येक पिंपांत एकेक हत्यारबंद असा इसम पोळून मेलेला आहे असं त्याला दिसलं. हें पाहून तो आश्चर्यानं मुग्ध होऊन त्या पिंपाकडे पहात राहिला. परंतु लगेच भानावर येऊन त्यानं विचारलं, "तो तेलाचा व्यापारी कुठं आहे ?"

"तो खरं म्हणजे तेलाचा व्यापारीच नव्हता" मार्गियाना म्हणाली. "तो एक दुष्ट खुनी होता. त्याच्या गोड बोलण्यानं फसून त्याच्या जाळ्यांत सापडून तुम्ही मृत्युमुखीं पडणार होतां. तो कोण होता, त्याचं काय झालं हें तुम्हांला मी सावकाश सांगेन तुम्ही नुकतेच स्नानगृहांतून आला आहांत. तेव्हां प्रथम थोडी कांजी घ्या. म्हणजे तुम्हांला हुशारी वाटेल. मग सारं सांगतें तुम्हांला !"

तिच्या म्हणण्याप्रमाणं अलिबाबा घरांत गेला. मार्गियानानं त्याला कांजी दिली. कांजी प्यायल्यावर तो मार्गियानाला म्हणाला, "ही सारी काय भानगड आहे ती ऐकण्याची मला उत्सुकता लागली आहे. तर ती सांगून माझ्या मनाचं समाधान कर !"

यावर मार्गियाना त्याला हकिगत सांगूं लागली. ती म्हणाली, "धनी, तुम्ही मला कांजी करायला सांगून झोपायला गेलांत. तुमच्या सांगण्याप्रमाणं मी तुमच्यासाठीं पांढरे स्वच्छ कपडे काढून ते अबदुल्लाकडे दिले. नंतर विस्तव पेटवून त्यावर कांजी शिजत ठेवली. ती तयार झाली कीं नाहीं हें पहायला मला दिवा हवा होता. परंतु सर्व दिव्यांतलं तेल संपलं होतं. मी ही अडचण जेव्हां अबदुल्लाला सांगितली तेव्हां त्यानं मला झोपडींतल्या पिंपांतलं तेल घेण्याचा सल्ला दिला. त्याप्रमाणं मी तेलाचं भांडं घेऊन

झोपडींत एका पिपाजवळ गलें. तों त्या पिपांतून हलक्या स्वरांत आवाज आला, "बाहेर येण्याची वेळ झाली काय ?" तो आवाज ऐकून मला आश्चर्य वाटलं. माझ्या लगेच लक्षांत आलं कीं व्यापाऱ्याचं सोंग घेतलेल्या त्या इसमानं तुम्हांला ठार करण्याचा डाव रचलेला आहे. त्याबरोबर मी हळूंच उत्तर दिलं कीं अद्याप वेळ आलेली नाहीं. नंतर मी दुसऱ्या पिपाजवळ गेलें. तिथंही मला तोच प्रश्न विचारलेला ऐकूं आला आणि मीही तेंच उत्तर दिलं. असं सर्व पिपांजवळ झालं. तेव्हां माझी खात्री पटली कीं तुम्ही ज्याला तेलाचा व्यापारी समजून घरांत पाहुणा म्हणून आश्रय दिला आहे त्याच्या इशाऱ्याची ते वाट पहात आहेत आणि इशारा मिळतांच तुम्हांला ठार करून तुमची सारी संपत्ती लुटण्याचा त्यांचा डाव आहे. परंतु त्याचा डाव सफल होण्याची मी त्यांना संधीच दिली नाहीं. शेवटचं पिप तेलानं भरलेलं होतं. त्यांतलं थोडंसं तेल घेऊन मी दिवा लावला. नंतर एक मोठी कढई विस्तवावर ठेवली आणि त्या पिपांतल्या तेलानं ती भरली. तें तेल चांगलं उकळूं लागल्यावर त्यांतलं थोडं थोडं तेल मी प्रत्येक पिपांत ओतलं. गरम तेल अंगावर पडतांच ते भाजून मेले. अशा तऱ्हेनं सर्वांना यमसदनीं पाठवल्यावर मी पुन्हां स्वयंपाक घरात आलें आणि सर्व दिवे मालविले व तो व्यापारी पुढं काय करतो याची वाट पहात खिडकींत बसून राहिलें. जरा वेळानं दरोडेखोरांचा तो म्होरक्या उठला आणि त्यानं बऱ्याच वेळां आपल्या सहकाऱ्यांना बाहेर येण्याच्या खुणा केल्या. परंतु त्याला कांहींच प्रत्युत्तर मिळालं नाहीं म्हणून तो झोपडींत गेला. तेव्हां त्याला आपले सर्व सहकारी ठार झालेले दिसले. त्याबरोबर तो काळोखांतून कुठं तरी पळून गेला. तो कुठं गेला हें कांहीं मला माहींत नाहीं. नंतर मी स्वस्थपणं झोपीं गेलें !" अशा रीतीनं सर्व हकिगत सांगून ती म्हणाली, "अशी आहे ही सारी हकिकत. गेले कांहीं दिवस मला याबद्दलची शंका येत होती. परंतु ती गोष्ट शेजाऱ्यांच्या कानावर जाईल या भीतीनं मी ती गुप्त ठेवली होती. परंतु आतां ती तुम्हांला सांगण्याशिवाय गत्यंतर नाहीं. एके दिवशीं सकाळीं मी घराबाहेर येतें तों दारावर मला खडूची एक पांढरी खूण दिसली. ती खूण कोणत्या उद्देशानं केली होती हें मला समजलं नाहीं. तथापि मी आजूबाजूच्या सर्व घरांवर तशाच खुणा केल्या कारण कुणी

तरी शत्रू धन्याच्या नाशाची खटपट करीत आहे असं मला वाटल. शेजाऱ्यांच्या घरांवर तशाच हुबेहूब खुणा केल्या कीं आपलं घर त्यांना ओळखून काढणं सोपं जाणार नाहीं असं मला वाटलं. हें सारं दुष्ट कृत्य त्या रानांतल्या दरोडेखोरांचंच आहे हें नीट ओळखा. आपलं घर केव्हांही शोधून काढतां यावं या हेतूनंच त्यांनीं घरावर खूण केली होती, त्या चाळीस चोरांपैकीं दोघांचं काय झालं मला माहीत नाहीं. तेव्हां त्या दोघांपासून आणि पळून गेलेल्या त्यांच्या म्होरक्यापासून तुम्ही आतां सावध रहा. अत्यंत काळजीपूर्वक वागा. तुम्ही त्यांच्या हातीं लागलांत तर ते तुम्हांला ठार केल्याशिवाय रहाणार नाहींत याची खात्री बाळगून वागा! तुमचं संरक्षण करण्यासाठीं माझ्याकडून जें जें होईल तें तें मी करीन. तुमच्या सेवेंत माझ्याकडून कमतरता होणार नाहीं!"

तिच्या ह्या शेवटच्या बोलण्यानं अलिबाबाला आनंद झाला तो म्हणाला, "तुझ्या एकंदर कामगीरीनं मी खूष झालों आहें. तुझ्या ह्या शूरपणाचा माझ्या जिवांत जीव असेतों मला विसर पडणार नाहीं. तुझ्यासाठीं काय करूं मी?"

परंतु ती म्हणाली, "ही गोष्ट कुणाला कळूं नये यासाठीं प्रथम तीं सारीं प्रेतं पुरण्याची योग्य ती व्यवस्था करायला हवी!"

हें ऐकून अलिबाबा अबदुल्लाला घेऊन बागेंत गेला. तिथं एका झाडाखालीं त्यानं सर्व प्रेतांना पुरेल एवढा खड्डा खणला. नंतर त्यांच्या अंगांवरील सर्व हत्यारं काढून घेऊन त्यांनीं तीं प्रेतं त्या खड्ड्यापर्यंत ओढीत आणून त्यांत टाकलीं. नंतर त्या सदतीस प्रेतांवर माती वगैरे टाकून तो खड्डा बुजविला व बागेंतली जमीन पूर्ववत् केली. नंतर त्यांनीं ती पिपं लपवून ठेवलीं व एक एक दोन दोन अशीं ती खेचरं बाजारांत नेऊन विकून टाकलीं. अशा तऱ्हेनं त्या गोष्टीवर पडदा पडला.

परंतु अलिबाबाचं मनःस्वास्थ्य मात्र बिघडलं. कारण जिवंत असलेले ते दोन चोर व त्यांचा तो म्होरक्या आपला कधीं तरी सूड घेतील याची त्याला सतत भीति वाटत होती. त्यामुळं तो स्वतः अगदीं गुप्तपणं राहूं लागला. आणि जें घडलं त्यांतलं त्यानं कांहींही कुणाला कळूं न देण्याची दक्षता

घतली. आपणाला मिळालेल्या त्या द्रव्याची कुणाला दाद लागूं नये याबद्दल ता नेहमी सावधगिरीनं रहात होता.

इकडे जिवंत सुटलेला तो म्होरक्या पळून रानांत गेला. तो अतिशय निराश अन् दुःखी झाला होता. त्याचं तेज दिवसेंदिवस हवेंत विरून जाणाऱ्या धुराप्रमाणं कमी कमी होत होतं. शेवटीं विचार करून करून त्यानं ठरवलं कीं कांहीं करून अलिबाबाला ठार करायलाच हवं. त्याला गुहा उघडण्याची ती गुप्त गोष्ट माहीत असल्यामुळं आपला नाश होईल. म्हणून अलिबाबाला जिवंत राहूं देणं योग्य नव्हतं. त्यानं विचार करून नक्की ठरवलं तें काम स्वत एकट्यानंच करावं. आणि अलिबाबाचा निकाल लागल्यावर मग दुसरे दरोडेखोर जमा करून पिढ्यान् पिढ्या चालविलेला पूर्वजांचा दरोडेखोरीचा धंदा पुनः सुरू करावा. हा विचार पक्का झाल्यावर तो त्या रात्रीं शांतपणानं झोपला.

दुसरे दिवशीं वेष पालटून तो गांवांत गेला आणि एका खाणावळींत उतरला. त्याचा तर्क होता कीं, इतक्या लोकांच्या खुनाची बातमी चौकीदाराच्या कानावर जाऊन त्यानं आलिबाबाला पकडलं असलं पाहिजे आणि त्याचा न्यायालयांत निवाडा होऊन अलिबाबाचं घरदार व संपत्ती जप्त झाली असली पाहिजे ही गोष्ट गावांतल्या बहुतेक लोकांना कळणारच असं त्याला वाटत होतं. म्हणून त्यानं खाणावळीच्या मालकाला विचारलं, "गेल्या कांहीं दिवसांत ह्या शहरांत आश्चर्यकारक अशा काय काय गोष्टी घडल्या ?"

खाणावळीच्या मालकानं स्वतः पाहिलेल्या व ऐकलेल्या अशा अनेक गोष्टी त्याला सांगितल्या. परंतु ज्या गोष्टी ऐकायची त्याला उत्सुकता लागली होती त्याबद्दल त्याला काहीच माहिती मिळाली नाहीं. त्यावरून त्याला समजून चुकलं कीं, आलिबाबा चांगला सावध आणि हुशार आहे. त्यानं आपली संपत्ती लुटून नेली इतकंच नव्हे तर आपल्या सदतीस लोकांचे जीव घेऊन सुद्धां तो निर्दोषी म्हणून वावरत आहे. तेव्हां आपणही सावध राहिलं पाहिजे. नाहीं तर आपण त्याच्या हातांत सांपडून आपलाच नाश व्हायचा. असा निश्चय करून त्यानं बाजारांत जाऊन एक घर भाड्यानं घेतलं. नंतर त्यानं आपल्या गुहेंतल्या त्या

अनुक्रम २९
विभाग
नों. दि

खजिन्यांतून भारी भारी कापड आणि इतर वस्तु आणून त्यानं घरांत ठेवल्या व त्यानं व्यापार सुरू केला.

दैवयोगानं त्याची ही जागा मृत कासिमच्या दुकानासमोरच होती. सध्यां तें दुकान कासिमचा मुलगा अलिबाबाचा पुतण्या चालवीत होता. त्या दरोडेखोरानं ख्वाजा हसन हें नांव धारण केलं. हळुहळु त्यानं शेजारीं व्यापाऱ्यांशीं ओळखी करण्यास सुरवात केली व तो सर्वांशीं प्रेमानं वागूं लागला. विशेषत: तो कासिमच्या मुलाशीं जास्त आपुलकीनं वागं लागला. ते दोघे बरेच वेळां एकत्र बसून गप्पागोष्टी वगैरे करूं लागले.

अलिबाबा अधून मधून आपल्या पुतण्याला भेटण्यासाठीं दुकानावर जात असे. एके दिवशीं तो तसाच दुकानावर गेला असतां त्याला तो दरोडेखोर तिथं बसलेला दिसला. त्यानं अलिबाबाला पाहिलं आणि तत्काळ ओळखलं.

एके दिवशी त्यानं त्या तरुणाला विचारलं, " तुझ्या दुकानावर वरचेवर येतो तो गृहस्थ कोण ? "

" तो माझा चुलता. माझ्या वडिलांचा भाऊ " तो तरुण म्हणाला.

त्या दिवसांपासून तो त्याला भुलविण्यासाठीं म्हणून त्याच्याशीं जास्तच प्रेमानं व आदरानं वागूं लागला. त्याला आपल्याबरोबर जेवायला बोलावून तो त्याला निरनिराळ्या तऱ्हेचे उत्तमोत्तम पदार्थ खायला घालूं लागला. त्यामुळं अलिबाबाच्या पुतण्याला वाटूं लागलं कीं आपणही त्याला एक वेळ जेवावयास बोलावलं पाहिजे. परंतु त्याचं घर लहान होतं. त्यामुळं त्या घरांत तो ख्वाजा हसनसारखा भपका दाखवूं शकत नव्हता. त्यामुळं त्याला वाईट वाटूं लागलं. तेव्हां त्यानं अलिबाबाकडे ती गोष्ट काढली. तेव्हां अलिबाबा म्हणाला, " तुझं म्हणणं बरोबर आहे. मित्रानं ज्याप्रमाणं तुझं आदरातिथ्य केलं आहे त्याप्रमाणं तूंही त्याचं केलं पाहिजेस. उद्यां शुक्रवार आहे. मोठ्या व्यापाऱ्याप्रमाणं उद्यां तूं तुझं दुकान बंद ठेव. सकाळचं खाणं झाल्यावर ख्वाजा हसनला फिरायला म्हणून आपल्याबरोबर ने आणि त्याला आगाऊ सूचना वगैरे कांहीं न देतां माझ्या घरीं घेऊन ये. त्याला मेजवानी देण्यासाठी मी मार्गियानाला निरनिराळीं पक्वान्नं करायला सांगतों. तूं त्या-बद्दल कांहीं काळजी करूं नकोस. सारं माझ्यावर लागलं ! "

अलिबाबाच्या सांगण्याप्रमाणं शुक्रवारीं सकाळचं खाणं झाल्यावर त्यानं

ख्वाजा हसनला बरोबर घेतलं व तो त्याच्याबरोबर बाजारांत बराच हिंडला. शेवटीं हिंडत हिंडत अलिबाबाच्या घराजवळ ते आले. घराजवळ आल्यावर त्यानं थांबून दार ठोठावलं व तो त्याला म्हणाला, "महाराज, हें माझं दुसरं घर आहे. माझ्या चुलत्यानं माझ्यावर तुमची मर्जी आहे हें ऐकलं आहे. म्हणून त्याच्या मनांतून तुम्हांला भेटायचं आहे. तेव्हां आंत येऊन त्याला भेटलांत तर त्यामुळं मला आनंद होईल आणि मी आपला आभारी राहीन!"

आपल्या शत्रूच्या घरांत सहज रीतीनं प्रवेश मिळतो हें पाहून त्याला आनंद झाला. तरी पण आपलं काम साधण्याची संधी मिळत असतांनासुद्धां त्यानं आंत येण्याचं नाकारलं व निरनिराळ्या सबबी सांगून तो परत जाण्यास निघाला. परंतु इतक्यांत एका गुलामानं दार उघडलं आणि तोंच अलिबाबाच्या पुतण्यानं त्याचा हात धरून त्याला आंत नेलं. तेव्हां नाईला-जानं त्यानं आपला मोठा सन्मान होत आहे असं भासवीत आंत प्रवेश केला.

अलिबाबानं आदरानं त्याला आंत बोलावलं आणि त्याचं कुशल विचारून म्हटलं, "तुम्ही माझ्या भावाच्या मुलाशीं मैत्री जोडण्याची कृपाच केली आहे. माझ्यापेक्षांही आपण त्याच्यावर जास्त ममता करतां असं मला आढळून आलं आहे."

ह्यावर ख्वाजा हसन आनंदी स्वरानं म्हणाला, "तुमच्या पुतण्याबद्दल मला फार आदर वाटतो. कारण वयानं लहान असला तरी अल्लानं त्याला शहाणपणा दिला आहे!"

अशा तऱ्हेनं ते दोघे मित्रांप्रमाणं बराच वेळ बोलत राहिले. नंतर ख्वाजा हसन जायला उठला. तो म्हणाला, "महाराज, आतां मला आपली रजा घेतली पाहिजे. पुन्हां केव्हां तरी मी आपल्याकडे येईन!"

परंतु त्याला जाऊं न देतां अलिबाबा म्हणाला, "मित्रा, आतां कुठं निघालास? आतां आपण जेवण उरकूं. नंतर मग तूं जा! तुझ्या घरीं असतील तशी पक्वान्नं कदाचित् तुला इथं मिळणार नाहींत. तरी पण तूं मेहरबानी करून जेवायला रहा अशी माझी तुला विनंती आहे!"

"आपल्या आमंत्रणानं मला आनंद झाला" ख्वाजा हसन म्हणाला. "आपलं आमंत्रण मी खुषीनं स्वीकारलंही असतं. परंतु कांहीं विशिष्ट

कारणामुळं मला तूं क्षमा कर आणि हें उदार आमंत्रण नाकारून जाण्याची मला परवानगी दे!"

'असं कोणतं महत्त्वाचं व तांतडीचं काम तुला आहे?' यजमानानं विचारलं.

"त्याचं कारण असं आहे" ख्वाजा हसन म्हणाला. "एका वैद्यानं मला नुकत्याच एका मोठ्या आजारांतून बरं केलं आहे. त्यानं मला सल्ला दिला आहे कीं, मीठ घातलेलं कांहीं खातां कामा नये म्हणून!"

"एवढंच ना?" अलिबाबा म्हणाला. "तर मग अद्याप भाज्या, मटन वगैरे तयार व्हायचं आहे. मी आचाऱ्याला त्यांत मीठ न घालण्याचा हुकूम देतों. पण आपण जेऊन जाण्याची माझी विनंती मान्य करा!" थोडा वेळ थांबा मी लगेच परत येतों!"

असं म्हणून अलिबाबा तिथून आंत गेला आणि त्यानं मार्गियानाला कोणत्याही पदार्थांत मीठ न घालण्यास सांगितलं. ती जरी स्वयंपाक करण्यांत गुतलेली होतीं तरी तें ऐकून तिला आश्चर्य वाटलं. तिनं विचारलं, "मीठ न घातलेलं जेवणारा असा हा कोण आहे?"

"तो कोण आहे याच्याशीं तुला काय करायचं आहे? तुला सांगितल्याप्रमाणं तूं कर!" अलिबाबा म्हणाला.

"ठिक आहे. तुमच्या हुकूमाप्रमाणं करतें!" ती म्हणाली. परंतु मनांतून मात्र तिला अशी विचित्र मागणी करणाऱ्या माणसाचं फार कुतूहल वाटलं आणि त्याला एकवार पहावं अशी इच्छा तिला झाली. सारा स्वयंपाक तयार झाल्यावर तिनं अबदुल्लाला पानं वाढण्यास मदत केली. ते जेवायला बसतांच तिनं ख्वाजा हसनला तत्काळ ओळखलं. त्यानं जरी व्यापाऱ्याचा वेष घेतला होता तरी तिनं त्याला ओळखलं. आणि बारकाईनं त्याच्याकडे पाहिल्यावर त्यानं आपल्या अंगरख्याखालीं लपवून ठेवलेला खंजीरही तिला दिसला. हें पहातांच ती स्वतःशींच म्हणाली, 'असं आहे तर! माझ्या धन्याला ठार करण्याची तो संधी पहात आहे म्हणून त्याला इथं मीठ खायचं नाहीं. परंतु मी आतां सावध झालें आहें. त्याला माझ्या धन्याला इजा करण्याची संधी मी मिळूं देणार नाहीं!"

अलिबाबाचं आणि ख्वाजा हसनचं जेवण झाल्यावर अबदुल्लानं मार्गियानाला फळं वगैरे आणायला सांगितलं. तिनं सुका मेवा, दारूचं एक

भांडं व पेले त्याच्यापुढं ठेवले आणि अबदुल्लाला ती जेवण्यासाठीं दुसऱ्या खोलींत घेऊन गेली.

तीं गेल्यावर ख्वाजा हसन म्हणजेच दरोडेखोरांचा तो म्होरक्या आपला मार्ग मोकळा झालेला पाहून स्वतःशींच आनंदानं म्हणाला, ' सूड उगविण्याची आतां योग्य वेळ आली आहे. त्याच्या छातींत खंजीर खुपसून बागेंतून पळ काढला कीं झालं. त्याचा पुतण्या कांहीं माझ्या वाटेला जाणार नाहीं. त्यानं कांहीं अडथळा केला अगर थोडीशी हालचाल केली तर तोच खंजीर त्याच्या छातींत खुपसून त्याचाही कारभार आटोपतां येईल. तेव्हां त्या गुलामाचं व दासीचं जेवण होऊन तीं झोपेपर्यंत थांबावं आणि मग कार्यभाग उरकून घ्यावा हें उत्तम ! "

परंतु मार्गियाना त्याच्याकडे बारकाईनं पहात होती. त्याचा दुष्ट हेतू ओळखून तिनं स्वतःशींच विचार केला की, ' ह्या दुष्टाला आतां धन्यावर वर्चस्व मिळविण्याची संधी देतां कामा नये. कांहींही करून त्याचा बेत हाणून त्याला ठार केलंच पाहिजे ! '

असा विचार करून त्या विश्वासू दासीनं आपले कपडे बदलले व नाचणाऱ्या बाया घालतात तसले कपडे घातले. तोंडावर तिनं भारी किमती रुमालाचा पडदा घतला. कमरेला जरीनं मढविलेला पट्टा घातला व त्यांत खंजीर लपवून ठेवला. त्या खंजीराची मूठ रत्नजडीत होती. अशा तऱ्हेनं वेषांतर केल्यावर ती अबदुल्लाला म्हणाली, " तूं आतां खंजीरी वाजव म्हणजे मी धन्याच्या पाहुण्याच्या आदरातिथ्यासाठीं नाच करतें ! "

तो तिच्या म्हणण्याप्रमाणं करण्यास तयार झाल्यावर तीं दोघं खोलींत आलीं. अबदुल्ला वाजवीत होता आणि ती त्याच्या मागोमाग चालत होती. त्यांच्या समोर आल्यावर कुर्निसात करून त्यांनीं नाच करण्याची परवानगी मागितली. अलिबाबा परवानगी देत म्हणाला, " पाहुण्याला आनंद आणि समाधान होईल असा नाच करा ! "

ख्वाजा हसन म्हणाला, ' तुम्ही खरोखरच चांगली करमणूक करीत आहांत !'

नंतर अबदुल्ला खंजिरी वाजवूं लागला आणि मार्गियाना आपल्या पायांची मोहक हालचाल करीत नाच करूं लागली. हळु हळु नाचत नाचत तिनं आपल्या पट्ट्यांतील खंजीर बाहेर काढला आणि तो फिरविला. तें पाहून

पहाणाऱ्याला आनंद झाला. ती मधून मधून त्यांच्या समोर उभी राहून त्या खंजिराचं पातं काखेंत धरीत होती, व मधूनच आपल्या छातीवर रोखीत होती. शेवटीं तिनं अबदुल्लाकडून खंजिरी घेतली व दुसऱ्या हातांत खंजीर घेऊन ती त्या तिघांमधून हिंडली. प्रथम ती अलिबाबासमोर उभी राहिली. त्यानं एक सोन्याची मोहर तिच्या खंजिरींत टाकली. त्याचप्रमाणं त्याच्या पुतण्यानंही एक मोहर त्या खंजिरींत टाकली. नंतर ती ख्वाजाकडे जाऊं लागली. ती आपल्याकडे येत आहे असं पाहून तो आपली पिशवी चांचपूं लागला. तेवढ्यांत मोठ्या चपळाईनं तिनं आपल्या खंजिराचा घाव त्याच्या वर्मीं घातला. त्याबरोबर तो दुष्ट इसम तत्काळ मरून पडला—

अलिबाबा चकित होऊन गेला. तो रागानं ओरडून म्हणाला, "काय केलंस तूं हें? माझा घात केलास!"

"नाहीं" ती म्हणाली. "तुमचा घात करण्यासाठीं नव्हे. परंतु तुम्हांला वांचविण्यासाठींच मी हें केलं आहे. त्याचे कपडे सैल करून त्याखालीं काय आहे तें पहा!"

तिच्या म्हणण्याप्रमाणं अलिबाबानं जेव्हां त्याचे कपडे तपासले तेव्हां त्याला लपवून ठेवलेला खंजीर दिसला—

"हा दुष्ट मनुष्य तुमचा शत्रू होता" मार्गियाना म्हणाली. "तेलाचा व्यापारी म्हणून तुमच्याकडे जो आला होता तोच हा तो दरोडेखोरांचा म्होरक्या! तुम्हांला तो ठार मारण्याच्या उद्देशानं इथं आला होता म्हणूनच तो तुमचं मीठ खाण्यास तयार नव्हता. तो मीठ खाणार नाहीं असं जेव्हां तुम्ही मला सांगितलं त्याच वेळीं मला त्याचा संशय आला आणि त्याला पहातांच माझी खात्री झाली कीं तो तुमचा खून करणार आहे. परंतु अल्लानं खैर केली!"

हें ऐकल्यावर अलिबाबानं कृतज्ञतेनं तिचे आभार मानले आणि तो तिला म्हणाला, "दोन वेळां तूं माझा जीव वांचविलास, तुझ्या ह्या उपकाराबद्दल मी तुला गुलामगिरींतून मुक्त करीत आहें आणि माझ्या ह्या पुतण्याशीं तुझं लग्न लावून देत आहे!" नंतर तो आपल्या पुतण्याला म्हणाला, "मी सांगतों त्याप्रमाणं कर म्हणजे तुझी भरभराट होईल. तूं मार्गियानाशीं लग्न करावं अशी माझी इच्छा आहे. ती कर्तव्याची आणि

अनुक्रम ... विभाग ...

स्वामिभक्तीची प्रतिमाच आहे. ख्वाजा हसननं माझा जीव घेण्याची संधी मळावी या हेतूनेच तुझ्याशीं मैत्री केली होती हें आतां तुला समजलंच आहे. परंतु ह्या तरुणीनं आपल्या शहाणपणानं आणि धूर्ततेनं आपणांस वांचविलं आहे !"

अलिबाबाच्या पुतण्यानं मार्गियानाशीं लग्न करण्याचं एकदम कबूल केलं. नंतर त्या तिघांनीं मोठ्या सावधगिरीनं गुप्तपणं तें प्रेत बागेंत नेऊन पुरलं.

अलिबाबानं मग मोठ्या थाटानं आपल्या पुतण्याचं मार्गियानाशीं लग्न लावून दिलं. लग्नाची त्यानं मोठी मेजवानी दिली. मेजवानीच्या वेळीं नाच गाणं वगैरे करून सर्वांची करमणूकही केली. तेव्हांपासून त्याची सारखी भरभराट होत गेली. त्याचं दैव खुललं होतं. गुहेंतल्या त्या खजिन्याचा मार्ग आतां त्याला खुला झाला होता. कारण कासिमचं प्रेत आणल्यानंतर तो त्या चोरांच्या भीतीनं त्या गुहेकडे पुन्हां गेलाच नव्हता. परंतु त्या दरोडेखोरांचा आतां नाश झाला होता. त्यानंतर बरेच दिवस गेल्यावर तो घोड्यावर बसून त्या ठिकाणीं गेला. मोठ्या सावधगिरीनं तो गुहेजवळ गेला तेव्हां त्याला तिथं जवळपास माणसाच्या पावलांच्या अगर घोड्यांच्या टापांच्या वगैरे कांहींच खुणा दिसल्या नाहींत. तेव्हां मोठ्या धैर्यानं तो घोड्यावरून उतरला आणि त्यानं घोडा एका झाडाला बांधून ठेवला.

नंतर गुहेच्या दाराजवळ जाऊन तो म्हणाला, "तिळा तिळा, दार उघड !" त्याबरोबर गुहेचा दरवाजा उघडला. त्यानं आंत जाऊन पाहिलं तों तिथली सारी संपत्ती जशीच्या तशी आहे असं त्याला आढळून आलं. हें पाहून त्याची खात्री पटली कीं त्या चोरांपैकीं आतां एकही जिवंत नाहीं आणि त्याच्या स्वतःखेरीज त्या गुहेची गुप्त गोष्ट कुणालाही माहीत नाहीं. नंतर त्यानं घोड्यावरून नेतां येतील इतक्या सोन्याच्या मोहरा एका पिशवींत भरून त्या घोड्यावर लादल्या आणि तो घरीं आला.

त्यानंतर नेमानं तो त्या गुहेंत जाऊन हवं असलेलीं द्रव्य आणूं लागला. ...ढं त्यानं ती जागा आपल्या मुलांना अन् नातवांना दाखविली व ती गुहा ...शी उघडावी कशी बंद करावी याची त्यांना माहिती दिली. अशा रीतीनं ...र्वी ज्या शहरांत तो दारिद्र्यांत रहात होता त्याच शहरांत तो अत्यंत ...मंतींत व ऐश्वर्यांत मोठ्या आनंदानं आपर

६२५९
आ-९१
IPBK-0106259